# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**विषय - अर्थसंकल्पीय तरतूदीचे प्रशासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन समिती,ठाणे यांच्या आदेशाप्रमाणे व मा.आमदार श्री.रईस ,शेख ,विधानसभा सदस्य,भिवंडी यांचे पत्राच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपुर महानगरपालिका (ड वर्ग) क्षेत्र हद्दीतील रस्त्यांची / गटार बनविणेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत खालील कामे प्रस्तावित केली आहेत. त्यास अंदाजपत्रकिय किमंतीच्या ७० टक्के हिस्सा जिल्हा नियोजन समिती मार्फत उपलब्ध करुन देणार आहेत व उर्वरित ३० टक्के हिस्सा म.न.पा ने भरावयाचा असल्याचे दि.१३/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्र.जिल्हा नियोजन अधिकारी,ठाणे यांनी कळविले आहे. सदर ७ कामांकरीता एकूण रु.१००.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित असून त्यामध्ये जिल्हा नियोजन समिती,ठाणे यांचा ७० टक्के हिस्सा म्हणजेच रु. ७०.०० लक्ष तर ३० टक्के हिस्सा रु. ३०.०० लक्ष भिवंडी मनपाचा आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत खालील प्रस्तावित कामे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.४ मधील बाळा कंम्पाऊंड,अन्सार मोहल्ला,सलामतपुरा परिसर व विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. | ९.९९ |
| २ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.१० मधील अंन्सार नगर,गुलजार नगर परिसर व विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. | १०.०० |
| ३ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.११ मधील जब्बार कंम्पाऊंड,रहमतपुरा परिसर व विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. | १५.०० |
| ४ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.१ वार्ड क्र.०३ मधील फातमानगर २० फीट रोड परिसर व विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. | २०.०० |
| ५ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१५ मधील नवीवस्ती परिसरात व विविध ठिकाणी गटर बनविणे. | ९.९९ |
| ६ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१४ मधील पिराणीपाडा,बिलालनगर,शांतीनगर परिसरात व विविध ठिकाणी नविन गटर बनविणे. | १५.०० |
| ७ | भिवंडी पुर्व मतदार संघातील प्रभाग समिती क्र.२ वार्ड क्र.१२ मधील न्यु आझादनगर,शांतीनगर व परिसरात विविध ठिकाणी गटर बनविणे. | २०.०० |
| | एकूण रक्कम | ९९.९८ |

वरील विकास कामांना मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी दि.१३/०२/२०२३ व दि.२४/०३/२०२३ रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात येणा-या अर्थसंकल्पामध्ये मध्ये "शासन योजने अंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा" या लेखाशिर्षामध्ये करण्यात आलेल्या रु.१०० लक्ष तरतूद मधून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या याजनेअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा रु.३०.०० लक्ष रक्कम प्रस्तावित आहे.

| लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद (रक्कम लाखात) | सन २०२३-२४ मध्ये होणारा खर्च (रक्कम लाखात) | शिल्लक रक्कम (रक्कम लाखात) |
|---|---|---|---|
| शासन योजनअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा | रु. १००.०० लक्ष | रु.३०.०० लक्ष | रु. ७०.०० लक्ष |

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजनेअंतर्गत वरील सातही कामांकरीता मनपाचा ३० टक्के हिस्सा रु.३०.०० लक्ष रुपायाच्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी दि.१३/०२/२०२३ व दि.२४/०३/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** 924 **दिनांक** 28/०३/२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्रमांक १ व २ मधील गटर व पाथवेज बनविणेकरीता नगरोत्थान योजनेअंतर्गत मा.श्री.रईस शेख,विधानसभा सदस्य, भिवंडी यांनी प्रस्तावित केलेल्या एकूण ७ कामांच्या अंदाजपत्रकीय किमंतीच्या ७० टक्के हिस्सा म्हणजे रु.७०.०० लक्ष जिल्हा नियोजन समिती उलब्ध करुन देणार आहे, तर ३० टक्के म्हणजेच रु.३०.०० लक्ष मनपा करणार आहे. त्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पामध्ये शासन योजनअंतर्गत विकास कामांकरीता मनपा हिस्सा रु.१००.०० लक्ष तरतूद करणेत आलेली आहे. त्यामधून रु.३०.०० लक्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान या योजनेअंतर्गत प्रस्तावित उपरोक्त ७ कामे करण्यास मनपा हिस्याचा रु.३०.०० लक्ष निधी देणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत १) गौतम कंपाऊंड नवीवस्ती (२५ एम.एल.डी.), शांतीनगर (१५ एम.एल.डी.), पोगांव (२ एम.एल.डी.), नुरीनगर (२ एम.एल.डी.), आझाद नगर (२ एम.एल.डी.) व वऱ्हाळदेवी (५ एम.एल.डी.) असे एकुण ६ क्लोरीनेशन प्लॅन्ट आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील क्लोरिनेशन प्लॅन्ट मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा जलवाहिनी मधून येणाऱ्या २५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला १.५ पी.पी.एम. क्लोरिनची मात्रा देण्यात येत होती. गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेची जुनी जलवाहिनी खराब झाल्यामुळे सदर जुनी जलवाहिनी बंद करुन दुसऱ्या नविन जलजोडणी देण्यांत आली आहे. परंतु नवीन जलवाहिनी मधून होणाऱ्या पाणी पुरवठ्याला क्लोरीनची मात्रा निरंक येत असून सदर पाणी पुरवठा भिवंडी शहरांत वितरीत झाल्यास जलजन्य आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर पिण्याच्या पाण्याला क्लोरीनची २ पी.पी.एम. पर्यंत क्लोरीन गॅसची मात्रा देणे जरुरीचे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे नव्याने बांधण्यात आलेले क्लोरीनेशन प्लॅन्ट कार्यान्वित करण्यांत आलेले आहेत. सदर क्लोरीनेशन प्लॅन्टमध्ये २) शांतीनगर - १५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ३) पोगांव - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ४) नुरीनगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ५) आझाद नगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा ६) वऱ्हाळदेवी - ५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा देण्यात येते.

भिवंडी शहरातील नागरीकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे कामी सदर सर्व क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये सन २०२३-२४ या वर्षाकरीता १) गौतम कंपाऊंड नविवस्ती - १८२ क्लोरीन गॅस सिलेंडर, २) शांतीनगर - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर, ३) पोगांव - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ४) नुरीनगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ५) आझाद नगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर व ६) वऱ्हाळदेवी - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर असे एकुण ५८३ क्लोरीन गॅस सिलेंडरची आवश्यकता आहे.

त्याकरीता खुल्याबाजारातुन दर प्राप्त करुन प्राप्त किमान दरांपैकी १०० किलो क्लोरीन गॅस सिलेंडर सर्व करांसहित प्रति नग ₹८०००/- याप्रमाणे सर्वांत कमी दराचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹४६,६४,०००/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | **रु.४६,६४,०००/-** |

सद्य कालावधीत मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळाली असुन महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** e४-९२६ **दिनांक :** २७ / ०३ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ₹ ४६,६४,०००/- मात्रच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ₹ ४६,६४,०००/- मात्रच्या प्रस्तावाची ई-निविदा महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय, आर्थीक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रफळ २६.०४ चौ.कि.इतके असून सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ७,११,३२७ इतकी आहे. भिवंडी शहर वस्त्रोउद्योग धंद्याचे असून भिवंडी शहरांत उद्योगधंद्यासाठी शहरा लगत व इतर राज्यातून नागरीक ये जा करीत असतात व काही नागरीक वास्तव करून राहत असून शहराची तरंगती लोकसंख्या ३.५० लक्ष अशी एकुण १०.५० लक्ष इतकी लोकसंख्या आहे.

भिवंडी शहरात स्टेम प्राधिकरण यांचेकडून ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ४० द.ल.लि. तसेच मनपाचे वऱ्हाळा तलावमधून ५ द.ल.लि. असा एकुण ११८ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. लोकसंख्येच्या मानाने पाण्याची गरज १५० द.ल.लि प्रतिदिन इतकी असतांना प्रत्यक्षात मंजूर कोटा ११८ द.ल.लि प्रतिदिन आहे. शहरामध्ये ३२ द.ल.लि प्रतिदिन पाणी पुरवठा कमी पडत असल्यामूळे शहरात पाणी टंचाई भासत आहे, पाणी टंचाईची परिस्थीती निर्माण होण्याचे दिवसांत नागरीकांना जलवितरण व्यवस्थेव्दारे नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होण्यासाठी पाईप लाईन निगा व दुरुस्तीचे कामाकरीता मंजूरी मिळणे आवश्यक आहे.

भिवंडी नि.शहर महानगपालिके अंतर्गत ठेकेदारांव्दारे करण्यात येणाऱ्या कामावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना शासकीय नियमानूसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मूळ मालकास फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडील **क्र.सकाआ/भिवंडी/२०२३/१२१ दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये** दर निश्चीत करून त्याबाबत मान्यता घेऊन पाणी पुरवठा भागात काम करणा-या कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू केले आहे. (**अकुशल कामगार**-किमान वेतन रु.११,५००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.१८,५७०/- व इतर भत्ते ई.पी.एफ. १२ टक्के अधिक १ टक्के प्रशासकीय,बोनस ८.३३ टक्के, उपदान ४.१७ टक्के, रजा वेतन ६.५० टक्के ई.एस.आय.सी. ३.२५ टक्के, घरभाडे ५ टक्के असे एकुण **रु.२६,०४४/**- होत आहेत.) (**अर्धकुशल कामगार**- किमान वेतन रु.१३०००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.२००७० व इतर अनुज्ञेय भत्ते असे एकुण **रु.२८,१४८/**- होत आहेत.)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाईप लाईन निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामास शासकीय, आर्थीक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.** | **१,२१,६२,६६२/-** |

**शासन आदेश क्र.एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.**

प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात निहाय पाईप लाईन निगा दुरुस्ती एका वर्षाकरीता प्रत्येकी ६ अकुशल कामगार लागणार असून सदर कामी रु.१,२१,६२,६६२/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने पाणी पुरवठा कामाकरीता भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६०५.९० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे, या तरतूदीच्या अधिन

P. T. O...

राहून रु. १,२१,६२,६६२/- मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले असून खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेकामी प्रस्तावास मंजूरीस्तव सविनय सादर.

**ठराव क्रमाक** ६४ ९२८ **दिनांक**२८/०३/**२०२३**

भिवंडी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात निहाय पाईप लाईन निगा दुरुस्ती एका वर्षाकरीता कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेकामी बाबत सन २०२३-२०२४ करीता प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील प्रभाग समिती क्र.१ ते ५ निहाय पाईप लाईन निगा दुरुस्ती एका वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय, आर्थीक व ई निविदा मागविणेकामी मंजूरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.**
**पाणी पुरवठा विभाग**

**विषय:- भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्ती एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता मिळणेबाबत, सन २०२३-२०२४.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे व-हाळदेवी येथील नवीन जलशुध्दीकरण केंद्रातून दररोज पाणी पुरवठा भिवंडी शहरांतील काही भागांत करण्यांत येतो, जलशुध्दीकरण केंद्राची दैनंदिन देखभाल,निगा व दुरुस्ती तसेच जलशुध्दीकरणांत होणारी पंपींग,व-हाळा जी.एस.आर.पातळीची तपासणी करणे इत्यादी कामे करणे करीता कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासते.

व-हाळा जलशुध्दीकरण केंद्र चालू करणे करीता व जलशुध्दीकरण केंद्राची निगा व दुरस्ती करीता तीन शिफ्ट मध्ये कर्मचा-यांची आवश्यकता आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्राकरीता महानगरपालिकेचे पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने जलशुध्दीकरण केंद्र चालविणे कामी खाजगी कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

भिवंडी नि.शहर महानगपालिके अंतर्गत ठेकेदारांव्दारे करण्यात येणाऱ्या कामावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना शासकीय नियमानूसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मूळ मालकास फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडील **क्र.स.का.आ/भिवंडी/२०२३/१२१ दि.२३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये** दर निश्चीत करून त्याबाबत मान्यता घेऊन पाणी पुरवठा विभागात काम करणा-या कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू केले आहे. (**अकुशल कामगार**-किमान वेतन रु.११,५००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.१८,५७०/- व इतर भत्ते ई.पी.एफ. १२ टक्के अधिक १ टक्के प्रशासकीय,बोनस ८.३३ टक्के,उपदान ४.१७ टक्के, रजा वेतन ६.५० टक्के ई.एस.आय.सी. ३.२५ टक्के, घरभाडे ५ टक्के असे एकुण **रु.२६,०४४/**- होत आहेत.)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्ती एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.** | **२८००२५१/-** |

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक यांना आहेत.**

**व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्तीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत ७ अकुशल मजूर लागणार आहेत.** किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत व सहाय्यक कामगार आयुक्त यांचे परीपत्रकान्वये व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल, निगा व दुरुस्तीकरीता मजूर सेवा पूरविणेकामी रु.२८,००,२५१/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने पाणी पुरवठा कामाकरीता भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६०५.९० लक्ष तरतूद करण्यात

आलेली आहे, या तरतूदीच्या अधिन राहून **रु.२८,००,२५१/-** मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले असून खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेकामी मंजूरीस्तव मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमाक** 92८ **दिनांक**२८/०३/**२०२३**

भिवंडी महानगरपालिकेच्या व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत कामास प्रशासकीय,आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेकामी बाबत सन २०२३-२०२४ करीता प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,पाणी पुरवठा विभागाकडील व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्राची देखभाल,निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा एका वर्षाच्या कालावधीकरीता पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय, आर्थीक व ई निविदा मागविणेकामी मंजूरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय, आर्थीक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रफळ २६.०४ चौ.कि.इतके असून सन २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या ७,११,३२७ इतकी आहे. भिवंडी शहर वस्त्रोउद्योग धंद्याचे असून भिवंडी शहरांत उद्योगधंद्यासाठी शहरा लगत व इतर राज्यातून नागरीक ये जा करीत असतात व काही नागरीक वास्तव करून राहत असून शहराची तरंगती लोकसंख्या ३.५० लक्ष अशी एकुण १०.५० लक्ष इतकी लोकसंख्या आहे.

भिवंडी शहरात स्टेम प्राधिकरण यांचेकडून ७३ द.ल.लि. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून ४० द.ल.लि. तसेच मनपाचे वऱ्हाळा तलावमधून ५ द.ल.लि. असा एकुण ११८ द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे. लोकसंख्येच्या मानाने पाण्याची गरज १५० द.ल.लि प्रतिदिन इतकी असतांना प्रत्यक्षात मंजूर कोटा ११८ द.ल.लि प्रतिदिन आहे. शहरामध्ये ३२ द.ल.लि प्रतिदिन पाणी पुरवठा कमी पडत असल्यामूळे शहरात पाणी टंचाई भासत आहे.

त्यामूळे पाणी टंचाईग्रस्त भागात बोअरवेलव्दारे नागरीकांची पाण्याची गरज भागवीली जाते. प्रभाग समिती क्र.१ ते ५ दरम्यान १०३९ हातपंप, १००३ सबमर्सिबल व जेट पंप ५२ असे एकुण २०९४ बोअरवेल आहेत. सदर बोअरवेल वारंवार किरकोळ दुरुस्तीमूळे नादुरुस्त होत असतात. त्यामूळे या परीसरातील मा.सन्मा. नगरसेवक/नगरसेविका,पदाधिकारी व नागरीक यांचे दुरध्वनी,भ्रमणध्वनी व लेखी स्वरुपात दैनंदिन तक्रारी प्रभाग समिती क्र.१ ते ५ मध्ये प्राप्त होत असतात येणाऱ्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्याचे दैनंदिन काम करावे लागते.

भिवंडी नि.शहर महानगपालिके अंतर्गत ठेकेदारांव्दारे करण्यात येणाऱ्या कामावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना शासकीय नियमानूसार किमान वेतन लागू करणे आवश्यक आहे. सदर कामगारांना किमान वेतन लागू न केल्यास मूळ मालकास फौजदारी गुन्हा दाखल करणेची तरतूद आहे. सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालयाकडील **क्र.सकाआ/भिवंडी/२०२३/१२१ दिनांक २३/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये** दर निश्चीत करून त्याबाबत मान्यता घेऊन पाणी पुरवठा विभागात काम करणा-या कंत्राटी कामगारांना किमान वेतन लागू केले आहे. (**अकुशल कामगार**-किमान वेतन रु.११,५००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.१८,५७०/- व इतर भत्ते ई.पी.एफ. १२ टक्के अधिक १ टक्के प्रशासकीय,बोनस ८.३३ टक्के,उपदान ४.१७ टक्के, रजा वेतन ६.५० टक्के ई.एस.आय.सी. ३.२५ टक्के, घरभाडे ५ टक्के असे एकुण **रु.२६,०४४/-** होत आहेत.) (**अर्धकुशल कामगार** - किमान वेतन रु.१३०००/- अधिक विशेष भत्ता रु.७०७०/- एकुण रु.२००७० व इतर अनुज्ञेय भत्ते असे एकुण **रु.२८,१४८/-** होत आहेत.)

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय, आर्थीक मान्यता मिळणेबाबत सन २०२३-२०२४.** | **१,०१,६२,४८३/-** |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

**प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रभाग निहाय प्रत्येकी ५ अकुशल मजूर लागणार आहेत.** किमान वेतन आधिनियम १९४८ अंतर्गत व

सहाय्यक कामगार आयुक्त यांचे परीपत्रकान्वये भिवंडी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्ती करीता प्रभाग निहाय प्रत्येकी ५ अकुशल कामगार लागणार असून सदर कामी रु. १,०१,६२,४८३/- मात्र खर्च अपेक्षित असल्याने पाणी पुरवठा कामाकरीता भाडेतत्वावर मजूर सेवा पुरविणे या लेखाशिर्षकात रु.६०५.९० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे, या तरतूदीच्या अधिन राहून रु. १,०१,६२,४८३/- मात्र रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले असून खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता व ई निविदा मागविणेबाबत मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** ८७ ९२८ **दिनांक :** २७ / ०३/ **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात बोअरवेल निगा दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधीकरीता मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३- २०२४ या वर्षाकरीता मनपा कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र. १ ते ५ निहाय अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्ती कामी मजूर सेवा पुरविणेबाबत प्रस्तावास प्रशासकीय,आर्थीक व ई निविदा मागविणेकामी मान्यता देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

०/८